MHBI120014152021

**नियमीत दिवाणी दावा क्र. २७८/२०२१ मधील**
**नि.क्र. २१ खालील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांचे विरुध्द झालेला विना लेखी कैफियतचा आदेश रदद करुन त्यांचा लेखी जबाब अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. उपरोक्त प्रतिवादी यांनी असे नमुद केले आहे की, प्रतिवादी क्र. १ यांना महत्वाची कागदपत्र न मिळाल्याने त्यांना त्यांचा लेखी जबाब व म्हणणे मुदतीत दाखल करु शकले नाहीत. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ यांचे विरुध्द दिनांक २९.०६.२०२२ रोजी झालेला विना लेखी जबाब आदेश रदद करुन त्यांचा लेखी जबाब अभिलेखावर घेण्याची विनंती केली आहे.

३. अर्जास वादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादी क्र. १ यांनी मुदतीत से व कैफियत दाखल केलेली नाही व अर्जातील कारण संयुक्तीक नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा असे म्हणणे सादर केले आहे.

४. अर्ज, म्हणणे व अर्जासोबत दाखल कागपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्ज व त्या सोबत दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादी क्र. १ यांच्या विरुध्द दिनांक २९.०६.२०२२ रोजी विना लेखी कैफियतचा आदेश झालेला आहे. समन्स मिळाल्यानंतर प्रतिवादी क्र. १ यांनी विहीत मुदतीत हजर होवून त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. असे असले तरी प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांचा लेखी जबाब अभिलेखावर घेण्यास संयुक्तीक कारण दर्शविले आहे. नैसर्गिक न्यायाच्या तत्वाच्या दृष्टीने प्रतिवादी क्र. १ यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्र. १ यांचा लेखी जबाब अभिलेखावर न घेतल्यास त्यांचे अपरिमीत नुकसान होण्याची शक्यता आहे. प्रस्तुत प्रकरणातील वाद विषय व झालेला विलंब लक्षात घेता वादी यांना खर्चाची रक्कम रु. १००/– देणे न्यायोचित होईल. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. निशाणी क्र. २१ येथील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. १ यांनी वादी यांना रक्कम रु. १००/– एवढा खर्च दिल्यानंतर त्यांचा लेखी जबाब अभिलेखावर घेण्यात यावा. प्रतिवादी क्र. १ यांनी सदर खर्चाची रक्कम न चुकता पुढील तारखेस अथवा त्यापूर्वी वादी यांना अदा करावी.

Digitally signed by RAJENDRA VASANT KADAM
Date: 2022.09.21 17:30:31 +0530

स्थळ–धारुर (रा.व.कदम )
दिनांक २१.०९.२०२२ दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
धारुर

## प्रमाणपत्र

मी अभिकथन करतो की, या पी.डी.एफ. वरुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयातील शब्द–नि–शब्द हे मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| **लघुलेखक ग्रेड–३** | **ए.एस.गंगणे** |
| न्यायालयाचे नाव | दिवाणी न्यायालय क. स्तर, धारुर |
| न्यायनिर्णयाची तारीख | २१.०९.२०२२ |
| न्यायनिर्णयावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | २१.०९.२०२२ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | २१.०९.२०२२ |

सही/–
(**ए.एस.गंगणे** )
लघुलेखक ग्रेड–३
दिवाणी न्यायालय क. स्तर, धारुर